

# श्रध्दांजली

एक होती अरुंधती,
वर्णन तिचे करू किती ।

रंग गोरा पान, केस काळेशार
शुभ्र सरळ दात, कांती तजेलदार ।

अभ्यासात हुशार, लेखन दर्जेदार
भावपूर्ण कविता, नृत्य डौलदार ।

सुवर्ण पदक मिळूनही गर्वाची बाधा नव्हती
समाजासाठी काही करण्याची ऊर्मी मनात होती ।

इंग्रजीवर प्रभुत्व, हिंदी-संस्कृतचा अभ्यास
कन्नड-तामीळची ओळख, मराठी-कोंकणी मायभास ।

प्रेमळ स्वभाव, विनयशील बोलणे
लहान थोर सर्वांनाच आवडे तिचे वागणे ।

लाडकी लेक आई-बाबांची, अरु ताई अनुजची
आजी-आजोबांसाठी तर साय दुधावरची ।

भावी सहजीवनाची स्वप्ने होती पहात
अनंतविकासच्या हाती देऊन आपला हात ।

वर्णन करताना शब्द अपुरे पडती
म्हणून म्हणतो नेति, नेति, नेति ।

अनंत आशा, अनंत योजना, अनंत स्वप्ने मनात
अनंताकडे नजर लावून विरून गेली अनंतात ।

सौदामिनी ती माझ्या मनातली
वीजेसारखी चमकून क्षणात निघून गेली ।

नसेल जरी ती अवती भवती किंवा या जगती
आठवणीतून मनात राहील सदैव अरुंधती ।

\- नाना